# Press Release

**FOR IMMEDIATE RELEASE : 29/11/2020**

## ट्विटर आणि इंस्टाग्राम डुप्लिकेट खाते (अकाऊंट) तयार होण्याच्या वाढत्या प्रकारणांबाबत

लॉकडाऊन काळात अनेकांचे खोटे ट्विटर आणि इंस्टाग्राम खाते (अकाउंट) उघडल्याचा अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. अनेक यूजर्स असे आहेत ज्यांचे ट्विटरवर खाते आहे, त्यांचे खाते डुप्लिकेट केले जातात. त्या खात्यांवरील फोटो आणि ट्विट कॉपी करून नवीन खाते त्याच नावाने सुरु केले जाते. काही जणांचे ट्विटरवर खातेच नसते, त्यांचे फेसबुकवरील फोटो, आणि पोस्ट कॉपी केल्या जात आहेत.

खऱ्या खात्यांवरील खरे फोटो, माहिती आणि पोस्ट कॉपी करून त्या द्वारे खोटे / डुप्लिकेट खाते सुरु करण्यामागे पुढील उद्देश असल्याचे निदर्शनास आले आहे -

- खोटे खाते सुरु करून संबंधित व्यक्तीच्या खऱ्या आयुष्यातील मित्रमैत्रिणी आणि नातेवाईकांना खोट्या खात्यात जोडणे आणि नंतर त्यांच्याकडे ऑनलाईन पैशांची मागणी करणे.
- खोट्या खात्यांवर त्या व्यक्तीच्या नावाने अश्लील फोटो किंवा व्हिडीओ टाकून बदनामी करणे.
- एका विशिष्ठ जाती, धर्म किंवा राजकीय पक्षाच्या विरोधात किंवा समर्थनार्थ पोस्ट करणे, ज्यामुळे सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येऊ शकते.

या पद्धतीने कोणीही कोणाचेही खोटे खाते तयार केल्याचे आढळुन आल्यास, संबंधित व्यक्तीच्या ते निदर्शनास आणून द्या. तसेच संबंधित व्यक्तीने त्याबाबत त्वरित सायबर पोलिसात तक्रार करणे गरजेचे आहे.

**अत्यंत महत्वाचे - कोणीही अगदी ओळखीची व्यक्ती असेल तरीही, कोणत्याही सोशल मीडिया माध्यमातून पैशांची मागणी केल्यास किंवा अश्लील / संशयास्पद फोटो व्हिडीओ पाठवल्यास त्वरित त्या संबंधित व्यक्तीशी फोनद्वारे संपर्क करावा किंवा फार अडचण वाटल्यास समक्ष जाऊन भेटावे.**
**कोणत्याही कारणास्तव सोशल मीडियाद्वारे पैसे देणे टाळावे.**

PN-CS11/02/Marathi

*जनहितार्थ जारी